# सायन्स ऑलिंपियाडमधील गुणवंतांचा सत्कार



**कर्वेनगर :** महाराष्ट्र सायन्स ऑलिंपियाडमधील यशस्वी विद्यार्थ्यांसोबत प्रा. सी. के. देसाई, उदय पांचभोर, विवेक सावंत, कृष्णा गणेश, राम ताकवले, एम. जी. ताकवले.

**कर्वेनगर, ता. २४ :** "मुलांची आवड लक्षात घेऊन त्या विषयाचे सखोल ज्ञान मुलांना देण्यासाठी पालक व शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. परीक्षेतील गुणांना अवास्तव महत्त्व न देता त्यातून आपली विषयाची समज, आकलनशक्ती किती वाढली याचा विचार केला पाहिजे. शालेय जीवनात परीक्षापद्धती महत्त्वाची आहेच; पण आयुष्य हीदेखील एक परीक्षा आहे. त्यामुळे आपण आयुष्यभर विद्यार्थीच असतो," असे उद्गार 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च'चे संचालक प्रा. कृष्णा एन. गणेश यांनी काढले.

महाराष्ट्र सायन्स ऑलिंपियाडमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार प्रा. गणेश यांच्या हस्ते झाला, त्या वेळी ते बोलत होते. शहरी, ग्रामीण सर्व विद्यार्थ्यांना समान दर्जाचे शिक्षण मिळवून शहरी-ग्रामीण अशी तफावत न करता शिक्षणपद्धती, स्पर्धा परीक्षांचे मूल्यमापन समान पद्धतीने होण्यासाठी एमकेसीएलचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. यामध्ये शिक्षकांवर मोठी जबाबदारी असून, देशाचे भावी आदर्श नागरिक घडवण्याची त्यांची जबाबदारी आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड धरून ग्रामीण विद्यार्थ्यांनादेखील समान शिक्षण मिळाले पाहिजे, असे गणेश म्हणाले.

या वेळी 'एमकेसीएल'च्या नेट प्रश्नसंचाचे प्रकाशन कृष्णा गणेश यांच्या हस्ते झाले. आय कन्सेंटने महाराष्ट्र ज्ञान मंडळाचे व्यासपीठ वापरून महाराष्ट्र शास्त्र ऑलिंपियाड अभियान ही चळवळ सुरू केली असून, शालेय प्रज्ञावंत विद्यार्थी निवडून त्यांच्यातील नैसर्गिक प्रज्ञेचे त्यांना विशिष्ट मार्गदर्शन करून आंतरराष्ट्रीय पातळीवर हे विद्यार्थी पोचवण्याचे काम या संस्थेद्वारे करण्यात येणार असल्याचे आर. जी. ताकवले यांनी सांगितले. यासाठी शिक्षक-पालक; तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये सुसंवाद असण्याची गरज आहे. परीक्षाकेंद्री न राहता विद्यार्थ्यांनी कार्यकेंद्री असावे, असेही ते म्हणाले. शैक्षणिक विषयांबरोबरच इतरही विषयांची ओळख शाळांमार्फत दिली गेली पाहिजे. निर्मितीवर आधारित शिक्षणपद्धतीवर भर दिला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानविषयक आवड निर्माण होईल.

२००९ मध्ये या संस्थेद्वारे ५५६४ विद्यार्थी सहभागी झाले होते. यापैकी ३६ विद्यार्थी महाराष्ट्र सायन्स ऑलिंपियाड स्कॉलर्स म्हणून जाहीर झाले. तीन वर्षांत २३ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. प्रीतिश लक्ष्मीकांत पाटील, शलाका शिंदे, अलंकार कोतवाल, मधुर कट्टर, सर्वेश चितोडकर यांना सुवर्णपदक मिळाले. या वेळी 'एमकेसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत, हेमंत वंदेकर, एम. जी. ताकवले आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीदेखील मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापक यशोधन काळे यांनी प्रास्ताविक केले.